# एमजीएम कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची झायडेक्सद्वारे निवड

झायडेएक्स प्रा. लि., पुणे या कंपनीच्या कृषी विभागासाठी महाविद्यालयामध्ये दि. २८ एप्रिल २०२३ रोजी निवड प्रक्रिया पार पडली. यामध्ये अंतिम सत्राच्या एकूण ३० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या निवड प्रक्रियेमध्ये विद्यार्थ्यांची लेखी परीक्षा, गट चर्चा व प्रत्यक्ष मुलाखत घेण्यात आली. या संपूर्ण प्रक्रियेतून महाविद्यालयची एकूण १० विद्यार्थ्यांची निवड झाली व त्यांची झायडेएक्स अंतर्गत महाराष्ट्रभर विविध ठिकाणी नियुक्ती करण्यात येणार आहे. यामध्ये महाविद्यालयाचे भूषण भेंडे, शिवप्रसाद दमाळे, वैभव काळे, सौरभ लहाने, वैभव चोरमले, रोहित तायडे, अमोल काकडे, सुशील दापके, कुलदीप भद्रे व दीपक नजन या विद्यार्थ्यांची निवड झाली. या निवड प्रक्रियेचे आयोजन एमजीएम कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाच्या प्लेसमेंट व क्षमता विकास विभागातर्फे करण्यात आले होते. यावेळी झायडेएक्स तर्फे श्री. महेंद्र बरबडे, उपव्यवस्थापक, पुणे व श्री. राहुल निंभोरे, प्रभागीय विक्री व्यवस्थापक, मराठवाडा विभाग, तर महाविद्यालयाच्या वतीने प्लेसमेंट व क्षमता विकास विभागाचे प्रा. डॉ. अशोक खर्डे यांनी काम पहिले. यावेळी एमजीएम गांधेली हिल्सचे संचालक श्री. सुदाम पवार व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नरेंद्रसिंग चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याबद्दल एमजीएम विद्यापीठाचे कुलपती श्री. अंकुशरावजी कदम व एमजीएम गांधेली हिल्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. प्रवीण सूर्यवंशी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.




**झायडेएक्सद्वारे निवड झालेले विद्यार्थी समवेत श्री. महेंद्र बरबडे, श्री. राहुल निंभोरे, डॉ. अशोक खर्डे, प्राचार्य डॉ. नरेंद्रसिंग चव्हाण व इतर प्राध्यापक वृंद.**



विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना एमजीएम गांधेली हिल्सचे संचालक श्री. सुदाम पवार




विद्यार्थ्यांना झायडेएक्स कंपनी बद्दल माहिती देताना श्री. महेंद्र बरबडे


निवड प्रक्रीये दरम्यान लेखी परीक्षा देताना विद्यार्थी


निवड प्रक्रीये दरम्यान गट चर्चा करताना विद्यार्थी व अधिकारी




**विद्यार्थ्यांची मुलाखत घेताना  झायडेएक्सचे अधिकारी  श्री. महेंद्र बरबडे व श्री. राहुल निंभोरे**